आपत्काळातील संजीवनी : नामजप उपाय - खंड २

# नामजपांमुळे दूर होणारे विकार

## (नामजपाविषयीच्या सूचनांसह मुद्रा व न्यासही अंतर्भूत)

मराठी (Marathi)


**संकलक**

**परात्पर गुरु डॉ. जयंत बाळाजी आठवले**

(‘संतपद’ वा ‘गुरुपद’ म्हणजे ७० टक्के, ‘सद्‌गुरुपद’ म्हणजे ८० टक्के, ‘परात्पर गुरुपद’ म्हणजे ९० टक्के, तर ‘ईश्वर’ म्हणजे १०० टक्के आध्यात्मिक पातळी !)

**पू. संदीप गजानन आळशी**



# सनातन संस्था


**सनातनच्या ग्रंथसंपदेचे अद्वितीयत्व !**

सनातनच्या बहुतांशी ग्रंथांतील सुमारे २० टक्के लिखाण हे ‘सूक्ष्मातून प्राप्त झालेले दिव्य ज्ञान’ असून ते पृथ्वीवरील उपलब्ध ज्ञानाच्या तुलनेत अनोखे आहे !

# विषयसूची

卐 ग्रंथाच्या संकलकांचा परिचय ५

卐 अध्यात्माचा अभ्यास करण्यासाठी आणि समाजाला धर्माचरण सांगण्यासाठी लिहिलेला ग्रंथ ! ७

卐 मनोगत ८

---

## अनुक्रमणिका

१. काही नामजपांमुळे बरे होऊ शकणारे विकार ९

२. नामजप करतांना करायच्या मुद्रा आणि न्यास, तसेच न्यास करण्यासाठीचे स्थान समजून घेणे आणि त्यानुसार उपाय करणे ३९

३. उपायांसाठी आवश्यक मुद्रा, न्यास व न्यास करण्यासाठीचे स्थान समजून घेऊन उपाय करण्यापेक्षा ते स्वतः शोधून उपाय करणे अधिक श्रेष्ठ ! ४९

४. नामजपाचे उपाय करण्याविषयीच्या सूचना ५४

५. नामजपाने विकार-निर्मूलन होण्याविषयी साधकांना आलेल्या काही अनुभूती ७६

---


**टीप :** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

## प्रस्तुत ग्रंथात ‘विकार’ हा शब्द वापरण्याचा उद्देश

प्रस्तुत ग्रंथात झोप न येणे, भूक न लागणे यांसारख्या लहान सहान त्रासांविषयीही माहिती दिली आहे. अशा त्रासांना ‘रोग’ म्हणणे सयुक्तिक नाही. आयुर्वेदानुसार ‘समस्थितीपासून (आरोग्यापासून) ढळणे’, म्हणजे ‘विकार’. यामुळे सनातनच्या ‘संकटकाळातील संजीवनी’ या मालिकेतील सर्व ग्रंथांत त्रास, रोग, व्याधी असे निरनिराळे शब्द न वापरता ‘विकार’ हा एकच सर्वसमावेशक शब्द वापरला आहे.

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांचे अद्वितीय कार्य आणि वैशिष्ट्ये यांचा संक्षिप्त परिचय !



१. आंतरराष्ट्रीय स्तराचे संमोहन-उपचारतज्ञ (वर्ष १९७८ ते वर्ष १९९५)

२. अध्यात्मप्रसारार्थ 'सनातन संस्थे'ची स्थापना

३. गुरुकुलासम सनातन आश्रमांची निर्मिती !

४. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी 'गुरुकृपायोग' या साधनामार्गाची निमिर्ती : गुरुकृपायोगानुसार साधना करून सप्टेंबर २०२१ पर्यंत ११२ साधक संत झाले, तर १,०९१ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू.

५. देवता, साधना, आचारपालन, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती आणि ग्रंथ-प्रकाशन

६. साधना आणि हिंदु धर्म शिकवणाऱ्या ध्वनी-चकत्या (ऑडिओ सीडी) आणि ध्वनीचित्र-चकत्या (व्हिडिओ सीडी) यांची निर्मिती

७. 'महर्षि अध्यात्म विश्वविद्यालया'चे संस्थापक : विश्वविद्यालयाद्वारे आध्यात्मिक संशोधन, आध्यात्मिक कार्यशाळांचे आयोजन इ. करण्यात येते.

८. वाईट शक्तींच्या संदर्भातील संशोधन आणि शारीरिक, मानसिक, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांवरील उपायपद्धतींविषयी संशोधन

९. स्वतःचा देह, तसेच वापरातील वस्तू यांच्यातील दैवी पालटांविषयी संशोधनकार्य अन् स्वतःच्या महामृत्यूयोगाचा संशोधनात्मक अभ्यास

१०. 'ईश्वरप्राप्तीसाठी कला' व कलेचे सात्त्विक सादरीकरण यांविषयी संशोधन

११. धार्मिक कृती व बुद्धीअगम्य घटना यांचे वैज्ञानिक उपकरणांद्वारे संशोधन

१२. आध्यात्मिक आणि सांस्कृतिक मूल्य असलेल्या सहस्रो वस्तूंचे जतन

१३. सप्टेंबर २०२१ पर्यंत २ बालक-संतांची, तसेच ६० टक्क्यांहून अधिक आध्यात्मिक पातळी असलेल्या २३७ अन् अन्य ८९५ दैवी बालकांची ओळख समाजाला करून दिली आहे. दैवी बालकांविषयी संशोधनही चालू आहे.

१४. प्राणी आणि वनस्पती यांचा सात्त्विकतेच्या दृष्टीने अभ्यास

१५. ज्योतिषशास्त्र आणि नाडीभविष्य यांच्याद्वारे विविधांगी संशोधन

१६. प्रखर हिंदुत्ववादी नियतकालिक 'सनातन प्रभात'चे संस्थापक-संपादक

१७. धर्माधिष्ठित हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी, देशभक्त आणि सामाजिक कार्यकर्ते यांचे संघटन अन् त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन

१८. परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या प्रेरणेतून चालू झालेले कार्य

१८ अ. हिंदु राष्ट्र-स्थापनेसाठी 'हिंदु जनजागृती समिती'

१८ आ. धर्मप्रेमी अधिवक्त्यांचे (वकिलांचे) संघटन 'हिंदु विधिज्ञ परिषद'

१८ इ. सात्त्विक पुरोहित सिद्ध करण्यासाठी 'सनातन पुरोहित पाठशाळा'

१८ ई. प्रसारमाध्यमांतून हिंदु धर्माची बाजू मांडण्यासाठी वक्ते सिद्ध करण्यासाठी 'सनातन अध्ययन केंद्र'

१८ उ. वैश्विक अध्यात्मप्रसारार्थ 'स्पिरिच्युअल सायन्स रिसर्च फाऊंडेशन'

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा - समनातनचा ग्रंथ 'परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या सर्वांगीण कार्याचा संक्षिप्त परिचय' आणि पहा - सनातनचे संकेतस्थळ 'www.Sanatan.org')**

---



## पू. संदीप आळशी

सनातनच्या ग्रंथांचे अंतिम संकलन करतात. राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (उदा. सनातन पंचांग, हस्तपत्रके) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक 'सनातन प्रभात'मधून प्रबोधनपर लेखन करतात.

## मनोगत

'नामजप-उपाय' या ग्रंथमालिकेच्या या खंडात काही देवतांचे नामजप कोणकोणत्या विकारांत उपयुक्त आहेत, हे एकाच दृष्टीक्षेपात कळण्यासाठी सूचीच्या स्वरूपात दिले आहेत. असे देण्याचे मुख्य कारण याप्रमाणे आहे - प्रत्येकाची स्वतःच्या उपास्यदेवतेप्रती किंवा ॐ सारख्या उपासना-जपाप्रती दृढ श्रद्धा असते. विकार-निर्मूलनासाठी स्वतःच्या उपास्यदेवतेचा नामजप किंवा उपासना-जप करायचा असल्यास तो अधिक श्रद्धेने केला जात असल्याने त्याने विकार लवकर दूर होण्यास साहाय्य होते.

मनुष्याच्या देहात पंचतत्त्वांपैकी एखाद्या तत्त्वाचे असंतुलन निर्माण झाल्यास देहात विकार निर्माण होतात आणि ते असंतुलन दूर करण्यासाठी, म्हणजेच त्यामुळे निर्माण झालेले विकार दूर करण्यासाठी त्या तत्त्वाशी संबंधित नामजपाप्रमाणेच मुद्रा आणि न्यासही उपयोगी आहेत. नामजपासह मुद्रा आणि न्यास केल्यास उपायांचा लाभ अधिक होतो. यासाठी ग्रंथमालिकेच्या या खंडात त्याविषयीही विवेचन केले आहे.

'नामजपाचे उपाय करून जास्तीतजास्त रुग्ण लवकरात लवकर विकारमुक्त होवोत', ही श्री गुरुचरणी आणि विश्वपालक श्री नारायणाच्या चरणी प्रार्थना ! - **संकलक**

**टीपा** १. मनुष्याच्या शरिरात विविध अवयव-संस्था असतात, उदा. पचनसंस्था, श्वसनसंस्था. ग्रंथात अवयव-संस्थांनुसार विकार दिले आहेत. एखादा नामजप एखाद्या संस्थेच्या किंवा अवयवाच्या सर्वच विकारांसाठी लागू पडत असल्यास त्या ठिकाणी 'त्या संस्थेचे किंवा अवयवाचे विकार (उदा. चेतासंस्थेचे विकार, यकृताचे विकार)', असे लिहिले आहे. 'विकारांनुसार नामजप-उपाय' या ग्रंथातील 'सूत्र २'मध्ये दिलेल्या विकारसूचीत त्या संस्थेच्या किंवा अवयवाच्या विकारांची उदाहरणे दिली आहेत.

२. पृथ्वी, आप, तेज आदी पंचमहाभूतांना 'पंचतत्त्वे' असेही म्हणतात. यासाठी ग्रंथात 'महाभूत' अन् 'तत्त्व' हे शब्द समान अर्थाने वापरले आहेत.